ARTHA - Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ पुणें, बुधवार तारीख २८ मे, १९५८ अंक ११

## विविध माहिती

**नवें मेडिकल कॉलेज**— १९५८–५९ च्या शैक्षणिक वर्षापासून तंजावर येथें एक मेडिकल कॉलेज स्थापन करण्याचें मद्रास सरकारनें ठरविलें आहे. ह्या कॉलेजसाठी लागणारा पैसा जिल्हा बोर्डानें पुरविला आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस वरील कॉलेजखेरीज तिरुचिरापल्ली आणि कोईमतूर ह्या ठिकाणींहि मेडिकल कॉलेजें उघडण्यांत येणार आहेत.

**रिहंड धरणावरील खर्च**—चालू आर्थिक वर्षांत उत्तर प्रदेशांतील रिहंड धरण योजनेवर ४·६१ कोटी रुपये खर्च करण्यांत येणार आहे. हें धरण दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेर पुरें करण्यांत येणार आहे. गेल्या सालीं ह्या धरणावर राज्यसरकारनें ४·५ कोटी रुपये खर्च केले होते.

**हिंदी टेलिग्राफ करणारांचें शिक्षण**—हिंदी भाषेंत टेलिग्राफ पाठवूं शकणाऱ्या २,००० पोस्टाच्या कामगारांना आतांपर्यंत शिक्षण देऊन तयार करण्यांत आलें. देवनागरी लिपींत लिहिल्या जाणाऱ्या कोणत्याहि भारतीय भाषेंत तारा पाठविण्याची सोय त्यांना शिक्षण दिल्यामुळें झाली आहे.

**काश्मीरांतील वीज-केंद्र**— जम्मू-श्रीनगर रस्त्यावर ४० मैल अंतरावर असलेल्या उधमपूर ह्या गांवीं नव्यानें बांधण्यांत आलेल्या वीज-केंद्राचें काम नुकतेंच चालू झालें. तेथील विजेचा उपयोग बऱ्याच खेड्यांना होणार आहे. धरणाच्या कामासाठी १६ लाख रुपये खर्च आला असून त्यावर ८०० किलोवॅट वीज उत्पन्न होऊ शकते.

**युगोस्लाव्हिआची पहिली अणुभट्टी**—युगोस्लाव्हिआंतील पहिल्या अणुभट्टीचें उद्घाटन मार्शल टिटो ह्यांच्या हस्तें करण्यांत आलें. ही अणुभट्टी बेलग्रेडजवळ आहे. अणुभट्टी उभारण्याच्या कामीं रशिअन तंत्रज्ञांचें सहकार्य घेण्यांत आलें असून जरूर तें आण्विक इंधनहि रशिआनेंच पुरविलें आहे.

**चर्चिल ह्यांचा सन्मान**—सर विन्स्टन चर्चिल ह्यांच्या सन्मानार्थ केंब्रिज येथें एक तांत्रिक व शास्त्रीय विषयांचें कॉलेज काढण्याचें घाटत आहे. कॉलेजसाठी ३५,००,००० पौंड खर्च येईल. निधी जमा करण्यासाठी ५,००० ब्रिटिश कंपन्यांच्या अध्यक्षांना विनंतीपत्रकें पाठविण्यांत आलीं आहेत.

**रुरकेला कारखान्याची यंत्रसामुग्री**—रुरकेला येथील पोलादाच्या कारखान्यासाठी यंत्रसामुग्री व इतर साहित्य मिळून ३ लाख टन वजनाचें सामान लागेल. हें सर्व साहित्य आयात करण्यांत येणार आहे. त्यापैकी एक तृतीयांश साहित्य आतांपर्यंत भारतांत आलें आहे. यंत्रसामुग्री घेऊन येणाऱ्या २,००० वाघिणी दरमहा रुरकेला येथें रिकाम्या करण्यांत येतात.

**उत्तर कोरिआकडून खतें**—भारत आणि उत्तर कोरिआ ह्यांच्या दरम्यान व्यापारी वाटाघाटी चालू आहेत. भारत कोरिआला कापड, ताग व चहा पुरविणार असून त्याच्या बदला मोठ्या प्रमाणावर खतें घेणार आहे. कोरिआनें खताची किंमत रुपयामध्यें घेण्याचें मान्य केलें आहे. हा व्यापार भारताच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनमार्फत करण्यांत येईल.

**पंचवार्षिक योजनेवर टीका**— राज्यसभेचे एक सभासद श्री. रघुवीर महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्समध्यें बोलतांना म्हणाले, कीं दुसऱ्या पंचवार्षिक योजनेनें आंखलेल्या विकासांच्या कामांत लोकांच्या खऱ्या गरजांकडे दुर्लक्ष करण्यांत आलें आहे. त्याचप्रमाणें एकूण लोकसंख्येपैकी फारच थोड्या लोकांचा कार्यक्रमाशीं निकटचा संबंध येत आहे.

**आंध्रांतील वीजपुरवठा**— आंध्र राज्य सरकारनें चालू वर्षांतील वीजपुरवठ्याच्या योजनांना मंजुरी दिली आहे. ह्या योजना ग्रामीण भागांत वीज पुरविणाऱ्या आहेत. आंध्र प्रदेशांत ५० लाख रुपये खर्च येणाऱ्या योजना अमलांत आणण्यांत येणार असून तेलंगण विभागांत १०·६२ लाख रुपये खर्चाच्या योजना अंमलांत येतील.

**निराळ्या विद्यापीठाची मागणी**—सौराष्ट्र भागासाठी निराळें विद्यापीठ स्थापन करण्यांत यावें अशी मागणी नव्यानें करण्यांत येत आहे. सौराष्ट्रांत सात आर्टस व सायन्स कॉलेजें, दोन व्यापारी कॉलेजें, एक इंजिनिअरिंग कॉलेज, एक मेडिकल कॉलेज आणि एक शिक्षकांचें ट्रेनिंग कॉलेज आहे. त्यामुळें सौराष्ट्रांत स्वतंत्र विद्यापीठास अनुकूल अशी परिस्थिति असल्याचें सांगण्यांत येतें.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## समाज विकास योजना आणि राष्ट्रीय विस्तार संघटना

### फेरविचारांची आवश्यकता : मूल्यमापन संघटनेचा अहवाल

"सामाजिक कार्यक्षेत्रांतील कार्यक्रमाविषयींचा सबंध दृष्टिकोन, त्यांतील आशय आणि तंत्र यांची संपूर्ण तपासणी करण्यांत यावी," असा एक प्रमुख निष्कर्ष कार्यक्रम मूल्यमापन संघटनेच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या समाज विकास योजना व राष्ट्रीय विस्तार संघटना यावरील पांचव्या मूल्यमापन अहवालांत काढण्यांत आला आहे.

जनतेच्या सहकार्याविषयीं या अहवालांत म्हटलें आहे कीं खेड्यांतील लोकांनीं रस्ते, शाळांच्या इमारती व पिण्याच्या पाण्याच्या विहिरी यांच्या कामांत मोठ्या प्रमाणांत भाग घेतला होता. तथापि, मनोरंजन आणि सामाजिक संबंध निर्माण करण्यासाठी स्थापलेल्या संस्थांत त्यांनीं विशेष आस्था दाखविली नाहीं. विकास गटाच्या कामाची मुदत संपण्याच्या सुमारास, लोक सहभागी होण्याचें मूल्य दर माणशीं पैशाच्या स्वरूपांत मोजल्यास, समाज विकास योजना तसेंच राष्ट्रीय विस्तार संघटना या दोन्ही विभागांत तें घटत होतें असें आढळून आलें ही चिंतनीय बाब असून त्याबद्दल संपूर्ण चौकशी करावयास हवी असेंहि या अहवालांत म्हटलें आहे.

शेतकी क्षेत्राबद्दल या अहवालांत म्हटलें आहे कीं सुधारलेलें बीं-बियाणें आणि खतें या बाबतींत कांहींशी सुधारणा दिसून आली तरी पडीक जमिनीची लागवड, भूमि-संरक्षण, यासारख्या इतर कांहीं बाबतींत फारच कमी काम झालें. तसेंच विशेष अनुकूल परिस्थिति नसलेल्या अशा रुक्ष, डोंगराळ अथवा वन्य जमातीच्या विभागांतील अनेक गटांत या कार्यक्रमाचा प्रभाव फारच कमी पडलेला आहे. देशाचा बराच मोठा भाग अशा गटांच्या कक्षेंत येत असल्यानें त्या गटांत वाजवी प्रमाणांत कार्य चालू असणें हा शेतकी क्षेत्रांतील या कार्यक्रमांतील एक प्रमुख प्रश्न झालेला आहे.

अशा प्रकारचा हा पांचवा अहवाल असून तो समाज विकास योजना आणि राष्ट्रीय विस्तार संघटना यांच्या यंत्रणा व कामकाज, ग्रामपंचायतींची संघटना व कार्यपद्धति, सुधारलेल्या शेतकी पद्धतींचा प्रसार आणि विकास गटांतील कागदपत्रांची व्यवस्था यासंबंधीं प्रत्यक्ष केलेल्या चार विस्तृत चौकशांवर आधारलेला आहे. सदर चौकशांमधून या कार्यक्रमांच्या सर्व बाबींचा विस्तृत आढावा घेण्यापेक्षा कांहीं निवडक बाबींचा विशेष अभ्यास करण्यावरच भर देण्यांत आलेला होता.

जादा शेतकी उत्पादनाबद्दल या अहवालांत म्हटलें आहे कीं पहिल्या समाज विकास योजनांची निवड करतांना कमी मुदतींत जादा उत्पादनास वाव असलेले विभाग पसंत करण्यांत आलेले होते. शेतकी उत्पादनांत मोठ्या प्रमाणांत वाढ करण्याची सध्यांची आवश्यकता लक्षांत घेतां दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या उरलेल्या काळांत निवडक विकास गटांत ह्या तत्त्वाचा अधिक नेटानें अवलंब केल्यास ती गोष्ट फायद्याची होईल. त्याचबरोबर कमी लक्ष दिलें गेलेल्या विभागांच्या गरजांचा विचार करून या कार्यक्रमांत अंतर्भूत केलेल्या गोष्टींचा विकास करणें अत्यंत आवश्यक असल्याचें या अहवालांत म्हटलें आहे.

३६ समाज विकास गट आणि ४६ राष्ट्रीय विस्तार गट अशा एकूण ८२ विकास गटांत विस्तृत स्वरूपावर केलेल्या पाहणीचे आणि कार्यक्रम मूल्यमापन संघटनेच्या २० कायमच्या मूल्यमापन केंद्रांत अधिक सखोल केलेल्या संशोधनाचे निष्कर्ष प्रस्तुत अहवालांत देण्यांत आले आहेत.

### बोटी बांधण्याचा दुसरा कारखाना

भारतांत मोठ्या बोटी बांधण्याचा एकच कारखाना सध्यां असून तो पूर्व किनाऱ्यावर विशाखापट्टम् येथें स्थापन करण्यांत आलेला आहे. अशाच दुसऱ्या एका कारखान्याची उभारणी करण्यासाठी कोलंबो मदतयोजनेच्या मार्फत तज्ज्ञांकडून सल्ला घेण्यांत येत आहे. दुसऱ्या कारखान्याची जागा निश्चित करण्यासाठी तज्ज्ञ-मंडळानें भारताला भेट दिली होती. मंडळाचा अहवाल आतां भारत सरकारच्या हातीं आल्याचें कळतें. मुंबई राज्यांतील माझगांव व ट्रॉम्बे, कोचीन, कांडला आणि कलकत्त्या-जवळील गारखळी, इतक्या जागा कारखाना काढण्याच्या सोईच्या आहेत असें मत अहवालांत व्यक्त करण्यांत आलें आहे. त्यांतहि माझगांव येथील गोद्यांची सुधारणा करून तेथें स्वयंपूर्ण असा बोटींचा दुसरा कारखाना उभारणें खर्चाच्या दृष्टीनें इष्ट होईल असें सुचविण्यांत आलें आहे. माझगांव येथें कारखाना काढण्यासाठी ८ कोटी रुपये खर्च येईल. ट्रॉम्बे येथें काढला तर १८ कोटी रुपये लागतील आणि कोचीन, कांडला व गावखली येथें काढला तर २० कोटी रुपये अगर अधिक खर्च येणार आहे. माझगांव हें ठिकाण पसंत करण्यांत आल्यास परदेशीय हुंडणावळीच्या दृष्टीनेंहि बचत होण्यासारखी आहे. मंडळाच्या अहवालासंबंधीं सरकार विचार करणार आहे. तरीपण हा दुसरा संकल्पित कारखाना भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर कोठल्यातरी ठिकाणीं उभारण्यांत येईल ह्याविषयीं शंका नाहीं. पश्चिम किनाऱ्यावरील कोणतें ठिकाण मुक्रर करण्यांत येईल तें मात्र सांगतां येत नाहीं.

---

### फिल्म्स खात्याचे चित्रपट आणखी आठ भाषांत निघूं लागले

सध्यां डॉक्युमेंटरी फिल्म्स पांच भाषांतून तयार केले जातात. त्यांत चालू आठवड्यापासून आणखी आठ भाषांची भर पडली आहे. त्या भाषा म्हणजे आसामी, गुजराती, कानडी, काश्मिरी, मल्याळी, मराठी, ओरिया आणि पंजाबी ह्या होत.

---

**रशिआचें अणुविज्ञान**—अणुविच्छेदन करणारा जो प्रचंड सायक्लोटॉन रशिआनें आपल्या संशोधनशाळेंत उभारला आहे तो तयार करण्याच्या कामांत प्रो. पॉंटेकार्व्हो ह्या शास्त्रज्ञानें महत्त्वाची कामगिरी केली आहे. प्रो. पॉंटेकार्व्हो ब्रिटनमधील हारवेल संशोधन केंद्रांत काम करीत होते. १९५० सालीं ब्रिटन-मधून ते एकदम नाहींसे झाले होते.

**नव्या दैनिकासाठी ट्रस्ट**—ता. ३१ मे पासून पुण्यांत 'विशाल सह्याद्रि' ह्या नांवाचें एक नवीन दैनिक सुरू करण्यांत येणार आहे. हें दैनिक महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचें अधिकृत मुखपत्र म्हणून प्रसिद्ध करण्यांत येईल. दैनिकासाठी श्री. मालोजीराव निंबाळकर ह्यांनीं एक ट्रस्ट निर्माण केला आहे.

**एंजिनिअरांची सक्तीची यादी नाहीं**—भारतामधील एंजिनिअरांची एक यादी करण्यांत यावी व त्यांत सर्व एंजिनि-अरांची सक्तीनें नांवें नोंदण्यांत यावीं अशी सूचना करण्यांत आली होती. पण भारत सरकारनें अशी यादी करण्याचें नाकारलें आहे. सक्तीची यादी तयार करण्यासाठी खास कायदा करावा लागेल.

# अर्थ

बुधवार, ता. २८ मे, १९५८



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## उज्जैन–देवास–इंदूर नवा रेल्वे मार्ग खुला

मध्यप्रदेशांतील माळव्याचें पठार सुपीक म्हणून प्रसिद्ध आहे. स्वातंत्र्योत्तर कालांत ह्या भागांतील उद्योगधंद्यांची वाढहि चांगली होऊं लागली आहे. परंतु, भारतामधील इतर कांहीं प्रदेशाप्रमाणेंच माळव्यांतहि सोयीस्कर अशा प्रकारचे रेल्वेमार्ग फारसे नव्हते. ही उणीव अंशतः भरून काढण्याच्या दृष्टीनें नुकत्याच खुल्या करण्यांत आलेल्या नव्या रेल्वे मार्गाचें महत्त्व बरेंच आहे. हा मार्ग म्हणजे उज्जैन–देवास–इंदूर ह्या शहरांना जोडणारा मार्ग. हा मार्ग ४९.२३ मैल लांबीचा असून रुंद रुळाचा आहे. पश्चिम रेल्वेवरील हा नवा रेल्वे रस्ता माळव्याच्या कापूस पिकविणाऱ्या काळया जमिनींतून जातो. माळव्यामधील लोकांनीं अशा प्रकारच्या रेल्वे रस्त्याविषयीं सुमारें ५० वर्षांपूर्वीपासून खटपट चालविली होती; आतां ती यशस्वी झाल्यामुळें माळव्याची औद्योगिक भरभराट होण्यास मदत होणार आहे. नवा रेल्वेमार्ग बांधण्यासाठी २०० लाख रुपये खर्च येईल असा अंदाज होता. पण, प्रत्यक्षांत ३३१ लाख रुपये खर्च झाला. सुमारें ५० मैल लांबीच्या ह्या मार्गावर १०० पूल असून त्यापैकीं ११ मोठे आहेत. मार्गावर १० रेल्वे स्टेशन्स आहेत. ह्या मार्गाचें एक टोक जें इंदूर शहर, ते औद्योगिक व व्यापारी घडामोडींच्या दृष्टीनें एक महत्त्वाचें केंद्र आहे. देवास येथील बाजारपेठ आतां इंदूर शहराला जोडली गेली आहे. त्यामुळें इंदूर येथील उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल आयात करून पक्का माल निर्यात करणें सोपें जाणार आहे. शिवाय, मध्यप्रदेशाची राजधानी असलेल्या भोपाळ शहराला जाणें आतां अधिक सोईचें होईल.

## थकलेल्या जकातीसाठी गिरणीची मालमत्ता जप्त

जामनगरच्या म्युनिसिपालिटीनें दिग्विजय स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल्स लि. ह्या कंपनीची मालमत्ता वारंट मिळवून जप्त केली आहे. गिरणीकडे म्युनिसिपालिटीची ऑक्ट्रॉय कराची ३५,००० रुपये बाकी थकलेली आहे. म्युनिसिपालिटीला कर लादण्याचा अधिकार नाहीं असें गिरणीचें मत होतें व ह्या प्रकरणीं हायकोर्टांत कज्जा चालू होता. हायकोर्टानें म्युनिसिपालिटीच्या बाजूनें निकाल दिल्यावर म्युनिसिपालिटीनें रीतसर कारवाई करून गिरणीची सुमारें १९,००० रुपयांची मालमत्ता ताब्यांत घेतली आहे. जप्तीच्या वारंटाची अंमलबजावणी होण्यापूर्वीं गिरणीतर्फे कांहीं दिवसांची मुदत मागण्याचा प्रयत्न करण्यांत आला. पण म्युनिसिपालिटीनें मुदत देण्याचें नाकारलें. वारंटाची अंमलबजावणी झाल्यावर असें आढळून आलें कीं म्युनिसिपालिटीनें जप्त केलेली गिरणीची मालमत्ता त्यापूर्वींच एका बँकेकडे गहाण ठेवण्यांत आलेली होती. जामनगरच्या मामलेदारानेंहि ६०,००० रुपये वसूल करण्यासाठीं एक वॉरंट मिळवून तें गिरणीवर बजावलें आहे. ही रक्कम कामगारांच्या प्रॉव्हिडंट फंडापायीं गिरणीकडून येणें आहे असें समजतें. दिग्विजय स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल ही गेल्या २४ मार्चपासून आर्थिक अडचणींत सांपडल्यामुळें बंद करण्यांत आली. गिरणी बंद झाल्यामुळें १,१०० कामगार बेकार झाले. ह्या गिरणीला एकूण ४० लाख रुपयांचें कर्ज झालें असून त्यापैकीं १० लाख रुपयांची रक्कम ही सरकारी कर्जाची आहे, असें म्हणतात. वॉरंट बजावण्याच्या कामीं म्युनिसिपालिटीच्या अध्यक्षांनीं पुढाकार घेतला.

## ब्रिटनकडून होणारी औषधांची निर्यात

ब्रिटनसारख्या उद्योगप्रधान देशाकडून जी निर्यात करण्यांत येते, त्यांत औषधासारख्या वस्तूंनाहि बरेंच प्राधान्य आहे. ब्रिटनच्या औषधी कारखानदारांच्या संघानें १९५७ सालाचा जो अहवाल प्रसिद्ध केला आहे त्यावरून हें दिसून येतें. कारखानदारांच्या संघांत १७५ औषधी कंपन्यांचे प्रतिनिधी आहेत. अहवालांत दिलेल्या माहितीप्रमाणें १९५७ सालीं ब्रिटननें ४,००,००,००० पौंड किंमतीचीं औषधें परदेशीं निर्यात केलीं. इतक्या मोठ्या प्रमाणावर औषधांची निर्यात होण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. ब्रिटनकडून औषधें घेणाऱ्या देशांत भारताचा दुसरा क्रमांक लागतो. भारतानें १९५७ सालीं ब्रिटनकडून २९,००,००० पौंड किंमतीचीं औषधें आयात केलीं. ह्या बाबतींत ब्रिटनचे मुख्य गिऱ्हाइक ऑस्ट्रेलिआ असल्याचें दिसून येतें. ऑस्ट्रेलिआनें ब्रिटनकडून ३४,००,००० पौंड किंमतीचीं औषधें आयात केलीं. भारतानें आपल्या आयातीवर निर्बंध घातले असल्यानें त्याचे परिणाम ब्रिटनच्या औषधी कारखानदारांना जाणवल्याचें नमूद करण्यांत आलें आहे. ऑस्ट्रेलिआ व भारत ह्यांच्या खालोखाल आयातीच्या बाबतींत ब्रह्मदेशाचा व चीनचा अनुक्रम लागतो. ह्या दोन्ही देशांनीं १०,००,००० पौंड किंमतीपेक्षा अधिक औषधें आयात केलीं. ब्रिटनच्या औषधी कारखानदारांनीं शास्त्रीय संशोधनाबाबत सहकार्यानें काम करण्याचें ठरविलें असून त्या बाबतींत समाधानकारक प्रगति करण्यांत आली आहे. ब्रिटनच्या अणुशास्त्रज्ञांनीं ह्या संशोधनांत पुढाकार घेतलेला आहे. अणुविज्ञानाचा औषधांच्या धंद्याला उपयोग करून घेण्यास त्यांची फार मदत होईल.

**दिल्ली–मॉस्को विमानमार्ग**—दिल्ली ते मॉस्कोपर्यंत थेट विमानमार्ग सुरू करण्याच्या वाटाघाटी पुऱ्या करण्यासाठी रशिअन तज्ज्ञांचें एक मंडळ दिल्लीला आलें आहे. विमानमार्ग बहुधा येत्या ऑगस्टपासून सुरू होईल. पहिल्याप्रथम दर आठवड्याला एकच विमान सोडण्यांत येईल.

**साखरेच्या निर्यातीसाठी संघटना**–भारत सरकारनें साखरेच्या निर्यात व्यापाराची व्यवस्था पाहण्यासाठी एक स्वतंत्र मध्यवर्ती संघटना उभारण्याचें ठरविलें आहे. हें काम स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनला करतां येणार नाहीं असें वाटल्यामुळें हा निर्णय घेण्यांत आला आहे.

# THE BHARAT INDUSTRIAL BANK

## Balance Sheet as

| 31-12-1956 | CAPITAL & LIABILITIES | Rs. nP. | 31-12-1957 Rs. nP. |
|---|---|---|---|
| | **1. Capital** | | |
| | *Authorised Capital* | | |
| 43,560 | 1089 6% Cumulative ( Redeemable after 5 years ) Preference Shares of Rs. 40/- each ... | 43,560—00 | |
| 15,00,250 | 30005 Ordinary Shares of Rs. 50/- each ... | 15,00,250—00 | 15,43,810—00 |
| 15,43,810 | | | |
| | *Issued and Subscribed Capital* | | |
| 43,560 | 1089 6% Cumulative ( Redeemable after 5 yeras ) Preference Shares of Rs. 40/- each ... | 43,560—00 | |
| 7,50,250 | 15005 Ordinary Shares of Rs. 50/- each. ... | 7,50,250—00 | 7,93,810—00 |
| 7,93,810 | | | |
| | *Called and Paid up Capital* | | |
| 27,225 | 1089 6% Cumulative ( Redeemable after 5 years ) Preference Shares @ Rs. 25/- each ... | 27,225—00 | |
| 3,75,250 | 15005 Ordinary Shares @ Rs. 25/- each ( out of which 5 shares are fully paid ) ... | 3,75,250—00 | |
| 4,02,475 | | 4,02,475—00 | |
| 2,290 | Less calls unpaid ... | 2,280—00 | |
| 4,00,185 | | 4,00,195—00 | |
| Nil | Add Forfeited Shares ... | Nil | 4,00,195—00 |
| 290 | *Calls in Advance* | | 290—00 |
| 1,05,000 | **2. Reserve Fund & Other Reserves** | | 1,17,000—00 |
| | **3. Deposits and Other Accounts** | | |
| 23,20,437 | Fixed Deposits and Recurring Deposits ... | 26,48,580—01 | |
| 25,50,515 | Savings Bank Deposits ... | 25,24,202—24 | |
| 11,08,916 | Current Accounts, Contingency Accounts, etc. ... | 11,54,995—89 | 63,27,778—14 |
| 59,79,868 | | | |
| | **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, etc.** | | |
| Nil | (i) In India. ... | Nil | |
| Nil | (ii) Outside India. ... | Nil | Nil |
| | *Particulars* | | |
| | (i) Secured (against Pledge of G. P. Notes) Nil | | |
| | (ii) Unsecured. Nil | | |
| 23,224 | **5. Bills Payable** | | 30,697—29 |
| | **6. Bills for Collection, being Bills Receivable** (as per contra) | | |
| 1,58,658 | (i) Payable in India ... | 1,75,744—49 | |
| Nil | (ii) Payable outside India ... | Nil | 1,75,744—49 |
| 52,836 | **7. Other Liabilities** ... | | 61,062—56 |
| Nil | **8. Acceptances, Endorsements and Other Obligations** (as per contra) ... | | Nil |
| | Carried over ... | | 71,12,767—48 |

# LIMITED, POONA CITY

## at 31st December, 1957

| 31-12-1956 | PROPERTY & ASSETS | Rs. nP. | 31-12-1957 Rs. nP. |
|---|---|---|---|
| | **1. Cash** | | |
| 3,54,355 | In hand and with the Reserve Bank and State Bank, (including foreign currency notes) ... | | 6,85,098—65 |
| | **2. Balances with other Banks** (In Current Account) | | |
| 1,53,816 | (i) In India ... | 2,32,112—54 | |
| Nil | (ii) Outside India ... | Nil | 2,32,112—54 |
| 3,00,000 | **3. Money at Call and Short Notice** ... | | 5,00,000—00 |
| | **4. Investments at cost.** | | |
| | Govt. Securities of the face value of Rs. 24,18,300 | | |
| 23,85,221 | (i) Securities of the Central and State Government and other Trustee securities, including Treasury Bills of the Central and State Governments. | 23,85,196—50 | |
| | (ii) Shares-Ordinary (at cost) | | |
| 21,823 | [i] Fully Paid (Market value Rs. 23,172,50—50) | 27,073—00 | |
| 5,000 | [ii] Partly Paid (Market value Rs. 1,875) | 1,500—00 | |
| Nil | (iii) Debentures or Bonds ... | Nil | |
| Nil | (iv) Other Investments ... | Nil | |
| Nil | (v) Gold ... | Nil | 24,13,769—50 |
| 24,12,044 | | | |
| | **5. Advances :** (other than bad and doubtful debts for which provision has been made to the satisfaction of the auditors) ... | | |
| | (i) *Loans, Cash Credits, Overdrafts, etc.* ... | | |
| 25,62,680 | In India 23,47,531—78 | | |
| | Outside India Nil | 23,47,531—78 | |
| | (ii) *Bills, Discounted and Purchased* (excluding Treasury Bills of the Central and State Governments.) | | |
| 2,38,359 | (i) Payable in India 2,12,467—78 | | |
| Nil | (ii) Payable outside India Nil | 2,12,467—78 | 25,59,999—56 |
| 28,01,039 | | | |
| | **Particulars of Advances : —** | | |
| 19,38,407 | (i) Debts considered good in respect of which the Banking company is fully secured ... | 16,06,764—81 | |
| 2,97,908 | (ii) Debts considered good for which the Banking company holds no other security than the debtors' personal security ... | 3,40,708—77 | |
| 5,00,302 | (iii) Debts considered good, and secured by the personal liabilities of one or more parties in addition to the personal security of the debtors ... | 4,84,284—24 | |
| 64,422 | (iv) Debts considered doubtful or bad, not provided for. | ,128,241—74 | |
| 28,01,039 | | 25,59,999—56 | |
| 57,356 | (v) Debts due by the directors or officers of the Banking company or any of them either severally or jointly with any other persons ... | 47,006—50 | |
| Nil | (vi) Debts due by companies or firms in which the directors of the Banking company are interested as directors, partners or managing agents, or in the case of private companiess as members ... | Nil | |
| 1,07,070 | (vii) Maximum total amount of advances including temporary advances, made at any time during the year to directors or managers or officers of the Banking company or any of them either severally or jointly with any other persons ... | 56,660—67 | |
| Nil | (viii) Maximum total amount of advances including temporary advances granted during the year to the companies or firms in which the directors of the Banking company are interested as directors, Partners, or Managing Agents, or in the case of private companies, as members. ... | Nil | |
| Nil | (ix) Due from Banking Companies ... | Nil | |
| | **6. Bills Receivable, Being Bills for Collection** as per contra | | |
| 1,58,658 | (i) Payable in India ... | 1,75,744—49 | 1,75,744—49 |
| Nil | (ii) Payable outside India ... | Nil | |
| | C. F.... | | 65,66,724—74 |

# THE BHARAT INDUSTRIAL BANK

**Balance Sheet as**

| 31-12-1956 | CAPITAL & LIABILITIES | Rs. nP. | 31-12-57 Rs. nP. |
|---|---|---|---|
| | Brought Forward ... | | 71,12,767—48 |
| | **9. Profit and Loss Account** | | |
| 21,083 | Profit as per last Balance-Sheet ... | 28,829—80 | |
| | Less appropriations : | | |
| | Reserve Fund 5,600-00 | | |
| | Investment Depreciation Fund 4,900-00 | | |
| | Dividend @ 6% on 6% C. R. P. Shares 1,225-00 | | |
| | Contingency Fund 1,500-00 | 13,225—00 | |
| | | 15,604—80 | |
| | Less depreciation for 1956 | 12,958—00 | |
| | | 2,646—80 | |
| | Add Profit for the year brought from the Profit and Loss Account (subject to Income-tax) ... | 22,467—23 | 25,114—03 |
| 28,830 | **10. Contingent Liabilities** | | |
| | In respect of partly paid shares held by the Bank as investment Rs. 1,500-00 and held on behalf of constituents Rs. 2,350-00 | | |
| 67,48,891 | Grand Total Rs. ... | | 71,37,881-51 |

## *PROFIT AND LOSS ACCOUNT FOR THE YEAR ending 31st December,1957*

| 31-12-1956 | EXPENDITURE | Rs. nP. | 31-12-57 Rs. nP. |
|---|---|---|---|
| 1,38,230 | 1. Interest paid on Deposits and Borrowings etc. ... | | 1,63,086—43 |
| 1,01,397 | 2. Salaries and Allowances and Provident Fund:— (including amount paid to Managing Directors) Rs. 16,447-44... | | 1,07,872—83 |
| 1,280 | 3. Directors' and Local Committee Members' Fees and Allowances. ... | | 1,140—00 |
| 11,580 | 4. Rent, Taxes, Insurance, Lighting etc. ... | | 14,272—54 |
| 480 | 5. Law Charges. ... | | 97—87 |
| 5,810 | 6. Postage, Telegrams and Stamps. ... | | 6,027—00 |
| 700 | 7. Auditors' fees ... | | 700—00 |
| 13,411 | 8. Depreciation on and repairs to the Banking Company's Property.( for the year 1957 ) ... | | 7,447—00 |
| 7,441 | 9. Stationery, Printing, Advertisement, etc. ... | | 8,212—36 |
| 46 | 10. Loss from sale of or dealing with non-banking assets | | 904—94 |
| 115 | 11. Loss on sale of investments in Govt. Securities ... | | Nil |
| 5,477 | 12. Other Expenditure. ... | | 6,695—08 |
| 25,132 | 13. Balance of Profit (subject to Income-tax for 2 years) | | 22,467—23 |
| 3,11,099 | Total Rs. ... | | 3,38,923—28 |

## AUDITOR'S REPORT

We have audited the attached Balance Sheet of the Bharat Industrial Bank Limited, as of 31st December 1957, and the Profit and Loss Account annexed thereto, for the year ended on that date in which are incorporated the unaudited returns of six Branches not visited by us.

In accordance with the provisions of Section 29 of the Banking Companies Act, 1949, read with the provisions to Sub-section (1) and (2) of section 211 and sub-section (5) of section 211 and section 227 (5) of the Companies Act, 1956, the Balance Sheet and Profit and Loss Account are not required to be and are not drawn up in accordance with the Sixth Schedule of the Companies Act, 1956. The Accounts are therefore drawn up in conformity with Forms A and B of the Third Schedule to the Banking Companies Act, 1949.

We report that (a) We have obtained all the information and explanations which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of our audit and have found them to be satisfactory ;

(b) The transactions of the bank which have come to our notice, have been within the powers of the Bank.

(c) In our opinion, proper books of account as required by law have been kept by the bank so far as appears from our examination of those books and proper returns adequate for the purpose of our audit have been received from the branches of the bank ;

(d) The Bank's Balance Sheet and Profit and Loss Account dealt with by this report are in agreement with the books of account and the returns ;

(e) Subject to the remark that the liability for taxation for the years 1956 and 1957 amounts to Rs. 29,775/-, in our opinion, and to the best of our information and according to the explanations given to us, the said accounts (together with the Directors' Report annexed thereto) give the information required by the Companies Act, 1956, in the manner so required for banking companies, and on such basis the said Balance Sheet gives a true and fair view of the state of the affairs of the Bank as at 31st December, 1957, and the Profit and Loss account gives true and fair view of the profit for the year ended upon that date.

KHARE & Co.
*Chartered Accountants.*

Poona, Date 14th February 1958.

# LIMITED, POONA CITY

## at 31st December 1957

| 31-12-1956 | PROPERTY & ASSETS | Rs. nP. | 31-12-1957 Rs. nP. |
|---|---|---|---|
| | B. F ... | | 65,66,724—74 |
| Nil | 7. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and Other Obligations as per contra ... | | Nil |
| | 8. Premises ( at cost ) | | |
| 3,75,171 | As per last Balance Sheet. ... | 3,76,259—17 | |
| 1,088 | Additions during the year ... | 564—00 | |
| 3,76,259 | | 3,76,823—17 | |
| 15,590 | Less Depreciation upto 31-12-1957 ... | 28,237—00 | 3,48,586—17 |
| 3,60,669 | | | |
| | 9. Furniture and Fixtures ( at book value ) | | |
| 61,521 | As per last Balance Sheet ... | 62,081—93 | |
| 611 | Additions during the year. ... | 426—87 | |
| 62,132 | | 62,508—80 | |
| 50 | Less sales during the year ... | 112—50 | |
| 62,082 | | 62,396—30 | |
| 10,506 | Less Depreciation upto 31-12-1957 ... | 16,522—29 | 45,874—01 |
| 51,576 | | | |
| | *Safe Deposit Vault Equipment* ( at book value ) | | |
| 37,080 | As per last Balance Sheet ... | 37,080—12 | |
| Nil | Additions during the year ... | Nil | |
| 37,080 | | 37,080—12 | |
| 1,834 | Less depreciation upto 31-12-1957 ... | 3,576—12 | 33,504—00 |
| 35,246 | | | |
| | 10. Other Assets Including Silver | | |
| 3,119 | Sundry Assets ... | 6,084—32 | |
| 22,332 | Interest accured on Govt. Securities ... | 21,525—00 | |
| 19,150 | Income-Tax deducted at source ... | 39,979—07 | |
| 25,328 | Stock of Printing (at cost) ... | 24,981—00 | |
| 540 | Library (at cost) ... | 592—05 | |
| 506 | Stamps in stock ... | 189—53 | |
| 1,174 | Branch adjustments ... | ... | |
| 17,460 | Due from bank in liquidation (not provided for). | 17,460—56 | |
| 972 | Pre-paid expenses ... | 1,484—31 | 1,12,295—84 |
| 90,591 | 11. Non-Banking Assets Acquired in Satisfaction of Claims ( Market Value ) ... | | 30,896—75 |
| 30,897 | | | |
| 67,48,891 | Grand Total Rs. ... | | 71,37,881—51 |

## *PROFIT AND LOSS ACCOUNT FOR THE YEAR ending 31st December, 1957*

| 31-12-1956 | INCOME | Rs. nP. | 31-12-1957 Rs. nP. |
|---|---|---|---|
| | ( Less Provision Made during the year for bad and doubtful debts and other usual or necessary provisions. ) | | |
| 2,76,162 | 1. Interest and Discount. ... | | 3,01,380—65 |
| 14,994 | 2. Commission, Exchange and Brokerage. ... | | 14,704—39 |
| 10,968 | 3. Rents. ... | | 11,025—00 |
| 1,088 | 4. Net Profit on sale of investments, gold and silver, land, premises and other assets ( not credited to Reserve or any particular fund or Account. ) ... | | Nil |
| Nil | 5. Net Profit on revaluation of investments, gold and silver, land, premises and other assets ( not credited to Reserves or any particular Fund or Account. ) ... | | Nil |
| 144 | 6. Income from non-banking assets and profit from sale of or dealing with such assets, ... | | 3,734—13 |
| 7,743 | 7. Other receipts ... | | 8,079—11 |
| 3,11,099 | Total Rs. ... | | 3,38,923—28 |

**M. K. Ternikar**
*Accountant.*

**N. N. Kshirsagar,**
**R. B. Salvekar,**
*Managing Directors.*

**K. P. Joshi,** *Chairman.*
**K. M. Mahajan,** *Vice-Chairman.*

**B. B. Walvekar,**
**Mrs. Indumatibai R. Phadake,**
**R. P. Damodare,**
} *Directors.*

**सीलोनच्या सरकारचें आश्वासन**—सीलोनच्या सरकारनें ह्यापुढें देशांत जें परदेशी खाजगी भांडवल गुंतविलें जाईल त्याविषयीं आश्वासन दिलें आहे. पुढील दहा वर्षांच्या काळांत सीलोनमध्यें जें परदेशीय खाजगी भांडवल गुंतविलें जाईल त्याच्या राष्ट्रीयीकरणांचा विचार करण्यांत येणार नाहीं, असें जाहीर करण्यांत आलें आहे.

**नवीन रेल्वे मार्ग**—दिल्ली भागांत गाझिआबाद ते तघलखाबाद पर्यंत १६ मैल लांबीचा नवा रेल्वेमार्ग बांधण्यास रेल्वे-बोर्डानें मंजुरी दिली आहे. ह्या मार्गासाठी सुमारें ३ कोटी रुपये खर्च येणार आहे. नवीन मार्गामुळें दिल्ली येथील माल वहातुकीची गर्दी कमी करण्यास चांगली मदत होईल.

**पाकिस्तानला आणखी मदत**—पाकिस्तानचे अर्थमंत्री पाकिस्तानसाठी अमेरिकेकडून आणखी आर्थिक व लष्करी मदत मिळविण्यासाठी अमेरिकेला गेले होते. अमेरिकेकडून आर्थिक मदत मिळविण्याच्या कामीं समाधानकारक बोलणीं झालीं असें ते कराचीला परतल्यावर म्हणाले. पाकिस्तानला खताच्या दोन कारखान्यासाठी १ कोटी डॉलर्स मिळणार आहेत.

**माथेरानच्या आकर्षणांत वाढ**—मुंबईजवळील माथेरान ह्या निसर्गरम्य थंड हवेच्या ठिकाणाचें आकर्षण आणखी वाढविण्याचे प्रयत्न करण्यांत येणार आहेत. ह्या दृष्टीनें माथेरान येथें जाण्यासाठी मोटारींचा रस्ता होणार आहे. त्याचप्रमाणें एक खुलें नाट्यगृह आणि पोहण्याचा तलाव ह्यांचीहि भर टाकण्यांत येणार आहे.

**स्त्री-शिक्षकांची राहण्याची सोय**—मध्यप्रदेश सरकारनें ग्रामीण भागांतील सरकारी शाळांतून शिकविणाऱ्या स्त्री-शिक्षकांसाठी राहण्याचीं घरें मोफत पुरविण्याचें ठरविलें आहे. प्रथम प्रयोग म्हणून दोन गांवें निवडण्यांत येणार आहेत. स्त्री-शिक्षकांची बदली करतांना त्यांच्या सोयी-गैरसोयींचा अधिक विचार करण्यांत येणार आहे.

**रशिआचा तिसरा उपग्रह**—रशिआंतील शास्त्रज्ञ तिसरा उपग्रह अंतराळांत सोडण्याची तयारी करीत आहेत. हा तिसरा उपग्रह पहिल्या दोन उपग्रहांच्या तुलनेनें बराच मोठा असेल अशी माहिती एका रशिअन शास्त्रज्ञानेंच जाहीर केली आहे. त्याचप्रमाणें चंद्रावर अग्निबाण सोडण्याची तयारीहि करण्यांत येत आहे.


श्री. वा. काळे ह्यांच्या कौटुंबिक पुस्तकांचे गुजराती अनुवाद.

'सस्तु साहित्य एटले उंचामां उंचुं साहित्य'

☞ સદાચારને પગલે અથવા શિષ્ટાચાર ☜

'पुढे पाऊल' ह्या दुसऱ्या पुस्तकाचा प्रा. शशिन ओझाकृत अनुवाद, विक्रीस तयार.

पृ. सं. १३७ ] ★ [ किंमत रु. १·२५

☞ સુખી જીવનની પગદંડી ☜

'कण आणि क्षण' च्या प्रा. ओझाकृत अनुवादाची दुसरी आवृत्ति.

पृ. सं. १६८ ] ★ [ किंमत रु. १·५०

सस्तु साहित्यवर्धक कार्यालय, अहमदाबाद

* दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड *

( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :-१० बुधवार पेठ, पुणें २ ★ मुंबई शाखा :-८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन २७६३ ) ★ कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन २५३४०८ )

अध्यक्ष श्री. ग. रा. साठे

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल ... ... रु. ७,३०,४९०
खेळतें भांडवल ... ... रु. ५८,००,०००

उपाध्यक्ष श्री. दा. ग. बापट

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १½% टक्के ★ मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाचे दरावावत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल्. बी. मॅनेजर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.